

लाखो दक्षिण भारतीय संगीतप्रेमी येशूदासचं नाव ज्या आदराने घेतात, तितक्याच आदराने परदेशी संगीतप्रेमीही येशूदासची गीतं ऐकतात.

डॉ. कट्टीसरी जोसेफ येशूदासची ख्याती संगीतक्षेत्रात दूरदूरवर पसरली आहे. चित्रपट गीतं, असंख्य धार्मिक गीतं, शास्त्रीय संगीत अशी तीस हजारांपेक्षा अधिक गीतं गाणाऱ्या येशूदासची सांगीतिक कारकीर्द चाळीस वर्षांची आहे. हिंदी चित्रपटात त्याचं पदार्पण १९७६च्या *छोटी सी बात*मधील 'जानेमन जानमन तेरे दो नयन...' या युगुल गीताने झालं. या चित्रपटाच्या आधी *आनंद महल*च्या पाच गीतांचं रेकॉर्डिंग झालेलं होतं. पण हा चित्रपट नंतर प्रदर्शित झाल्यामुळे पहिलं हिंदी चित्रपट गीत म्हणून येशूदासच्या खात्यावर 'जानेमन जानेमन...'ची नोंद झाली.

राजश्रीच्या *चितचोर*, *दुल्हन वही जो पिया मन भाये*, *सुनयना*, *मान अभिमान*, *सावन को आने दो* या चित्रपटांचा काळ त्याच्या हिंदीतील कारकीर्दीचा सुवर्णकाळ ठरला. या सगळ्याच चित्रपटांचं

चितचोरमधील एक दृश्य





सुनयनाचे कलाकार

संगीत रवींद्र जैन यांचं होतं. येशूदासच्या इतर हिट गाण्यांमुळे 'मधुबन खुशबू देता है...' (*साजन बिना सुहागन*), 'दिल के तुकडे तुकडे कर के...' (*दादा*) या दोन्ही गीतांना उषा खन्नाचं संगीत होतं. 'का करू सजनी...' (*स्वामी*), 'देख लो इश्क का मर्तबा...' (*चरनदास*) या गीतांना राजेश रोशनने संगीत दिलं होतं. *त्रिशूल*मधलं खय्यामने संगीतबद्ध केलेलं 'मुहोब्बत बडे काम की चीज है...' आणि बप्पी लाहिरींच्या संगीत रचनेतील *टूटे खिलौने*चं 'माना हो तुम...' ही गीतंही विशेष लोकप्रिय ठरली होती.

येशूदास शास्त्रीय संगीतावर आधारित चित्रपट गीतंच गातात. जयदेवच्या संगीतातील *आलाप*, रवींद्र जैनच्या संगीत दिग्दर्शनाचा *तानसेन* जो कधीच प्रदर्शित झाला नाही, आणि लक्ष्मीकांत-प्यारेलालच्या संगीतात *जरा सी जिंदगी*चं 'जमाने से कुछ लोग डरते नही...'चा समावेश केला जातो.

दायरा, *हिंदुस्तानी* आणि *दौड*मधील गाणी त्याच्या हिंदी चित्रपट गीतांच्या कारकीर्दीतली अखेरची गाणी. कारण आता येशूदासने आपल्या पसंतीचीच गीतं गाण्याचं नक्की केलं आहे. अशी गीतं ज्यात आपल्या संस्कृतीची छाप असेल. एखाद्या अख्यायिकेप्रमाणे वाटणाऱ्या येशूदासच्या मते गाने गाने पे लिखा है गानेवाले का नाम. २००१मध्ये येशूदासचा *सितारों में तू ही* हा अल्बम राष्ट्रीय स्तरावर, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर *अहिंसा* हा इंग्रजी अल्बम प्रकाशित झाला. *सितारों में तूही*ची आवश्यक तेवढी जाहिरात झाली नाही. येशूदास व्यवसायानिमित्त परिवारासह अमेरिकेतच राहतो. सध्या संगीत मैफिलींमधूनच तो अधिक व्यग्र असतो. भारत दौऱ्यावर आलेल्या येसूदासची मुद्दाम गाठ घेऊन त्याच्या सुरिल्या प्रवासाविषयी जाणून घेण्याची संधी मिळाली.

येशूदासच्या एका मित्राने लॉस एन्जलीसमध्ये संगीत समारंभाचं आयोजन केलं होतं. श्रोत्यांमध्ये रिकार्डो बेरेन्टीस पण होता. समारंभ संपल्यानंतर त्याने येशूदासची भेट घेतली आणि थेट विचारणा केली, तुम्ही माझ्यासाठी गाल? येशूदास म्हणतात, 'मला पॉप संगीतात रूची नव्हती. म्हणून मी त्याला नंतर संपर्क साधा असं ढोबळ उत्तर दिलं. मध्ये दोन महिने तसेच गेले. दोन महिन्यांनंतर त्याने खरोखरच माझ्याशी संपर्क साधला. त्याने माझं गाणं खरोखरच 'ऐकलं' होतं. यावर माझा विश्वास बसला. त्याने मला सर्कल ऑफ रिटर्न गाऊन दाखवलं. चाल खूपच कठीण होती. त्याला संगीताची असलेली जाण मला प्रभावित करून गेली.

१४ नोव्हेंबर १९९९ला पॅरिस येथील वर्ल्ड पीस ऑर्गनायझेशनतर्फे आयोजित मिलेनियम कॉन्सर्टमध्ये आम्ही पहिल्यांदा अहिंसाचं शीर्षक गीत सादर केलं. महात्मा गांधींनी अहिंसेची जी शिकवण घालून दिली तिचा प्रसार होणं, जगाने त्या मार्गावरून चालणं ही आज काळाची गरज आहे. आयोजकांनी *जुनून* या पाकिस्तानी बॅण्डचाही या कार्यक्रमात सहयोग मिळवला होता. त्यावेळी मीही गायलो.

इंग्रजी गाणं गाताना मला पूर्णपणे स्वातंत्र्य देण्यात आलं होतं. इंग्रजी गायक म्हणून मला त्यात कितपत यश मिळालंय याची कल्पना नाही. पण अहिंसाचं मूळ तत्त्व क्षमा आणि समर्पण यांचं मला आकर्षण वाटलं. इंग्रजी भाषा आज उभ्या जगाची भाषा आहे.



येशूदासचा गाजलेला चित्रपट *सावन को आने दो*

म्हणूनच या भाषेतून अहिंसा आणि क्षमाशीलतेचा संदेश देण्याची संधी मला या अल्बममुळे मिळाली.'

□ शांती आणि अहिंसा याविषयीचे तुमचे विचार काय आहेत?

– आज जिकडे तिकडे हिंसेचा उद्रेक झालेला आहे. अशा वेळी जगाला प्रेम, क्षमा आणि समर्पणाची शिकवण देणं अत्यंत आवश्यक आहे. पण धर्माच्या नावाखाली लोक हिंसेला खतपाणी घालतात याचंच दुःख वाटतं.

□ तुम्ही वेगवेगळ्या धर्मांची भक्तीगीतं गाता?

– आपण ईश्वराची निर्मिती आहोत यावर सगळ्याच धर्मांचा विश्वास आहे. पण मग ईश्वराची निर्मिती कोणी केली? या प्रश्नाचं उत्तर कोणीही देऊ शकत नाही. मी त्या सर्वव्यापी शक्तीचं अस्तित्व मान्य करून स्वतःला तिच्या ठायी समर्पित करतो. गेली चाळीस वर्षं मी भक्तीगीतं गातोय.

एक अज्ञात शक्ती माझ्याकडून हे काम करवून घेतेय, यावर माझा दृढ विश्वास आहे. म्हणूनच गायला सुरुवात करण्याआधी मी ईश्वराची प्रार्थना करतो. हे मी मुस्लीम बांधवांकडून शिकलो. कोणतंही काम सुरू करताना ते अल्लाची आराधना करतात. कोणत्याही धर्माकडून चांगली शिकवण घेण्यात वाईट काय आहे? मी सगळ्या धर्मांची भक्तीगीतं गातो, त्यातून मिळणारं आत्मिक समाधान काही वेगळंच असतं.

□ तुम्ही देवळांमध्ये भजनं गाता म्हणून केरळच्या चर्चने तुमच्यावर बहिष्कार घातला होता?

– एक छोटीसी समस्या उद्भवली होती. पण भजनं गायली तरी मी धर्मांतर करणार नाही याची त्यांना खात्री पटली तेव्हा सगळं शांत झालं. चित्रपटसृष्टीत आलो तेव्हाही नाव बदलण्याचा सल्ला अनेकांनी दिला होता. त्यावेळी हिंदू नावं ठेवण्याची फॅशन होती. पण माझ्या वडिलांनी मला विरोध केला. ते म्हणाले, 'नाव बदलल्याशिवाय तुला काही मिळणार नसेल तर अशा इंडस्ट्रीचा त्याग करणंच योग्य.' पण मी माझ्या मुलांवर अशा प्रकारची कोणतीही अट लादणार नाही. मोठेपणी त्यांना योग्य वाटेल त्या धर्माचं त्यांनी आचरण करावं, माझी हरकत नसेल.

□ देवळात गाण्याबाबत हिंदूंनी काही विरोध केला?

– केरळच्या ज्या आयप्पाच्या देवळात मी भजनं म्हटली तिथे एक दर्गा आणि चर्चही आहे. त्यांचं तत्त्वज्ञान फारच व्यापक आहे. तिथे मी अनेकदा भजनं म्हटली. तामीळनाडूतील लोकांचा दृष्टिकोन उदार आहे. पण गुरुवापुरच्या देवळात मात्र मला प्रवेश नाकारला होता.

□ श्रेष्ठ दर्जाच्या संगीताकडे लोकांना कसं आकर्षित करता येईल?

– त्या दिशेने प्रसार माध्यमच चांगलं काम करू शकतात. चांगल्या संगीताला प्रोत्साहन दिलं गेलं पाहिजे. पण हल्लीच्या म्युझिक कंपन्या आणि वाहिन्यांना फास्ट गाणी हवी असतात. त्यामुळे चांगल्या दर्जेदार संगीताला प्रोत्साहनच मिळत नाही. मी जेव्हा गातो तेव्हा लोकांचं सगळं लक्ष गीताच्या बोलांवर आणि माझ्या सुरांवर एकवटलेलं असावं याबाबत माझा कटाक्ष असतो. स्टेजवर गायकाने गाता गाता नाचणं मला अजिबात आवडत नाही. आज संगीतप्रेमी मंडळींनी दर्जेदार संगीताला संधी देणारी एखादी खास वाहिनी सुरू व्हायला पाहिजे.

□ पण आजच्या पिढीला असं संगीत कुठे हवंय?

– हा या पिढीचा दोष नाही. त्यांच्यासमोर सतत पॉप संगीतच सादर केलं गेलं तर शास्त्रीय संगीतातलं माधुर्य त्यांना समजणार कसं? विशुद्ध विचारांपासून आपणच त्यांना दूर नेत आहोत. रोज रोज मुलांना पिझ्झा खाऊ घातला तर अस्सल भारतीय पदार्थांची चव त्यांना कशी कळणार?

हे वधान मी उगीच करत नाहीये. मुंबईत एका कार्यक्रमात मी भक्तीगीतं गायलो. त्या कार्यक्रमाला उपस्थित तमाम तरुण श्रोतृवृंद अक्षरशः डोलत होता. पण आज गायकाचा आवाज दडपणारी वाद्यंच अधिक जोरजोरात वाजवली जातात. त्यामुळे गायकाची एकप्रकारे मुस्कटदाबीच होते ना? अशा वेळी त्या गायकाला तरी गाण्याचं समाधान मिळत असेल का? अशी गाणी गाण्यापेक्षा मी घरात निवांत बसणं पसंत करेन.

□ तुम्ही फारच थोडी चित्रपट गीतं गायलीत. असं का?

– दक्षिण भारतातील त्रिवेंद्रम येथे मी स्वतःचा स्टुडियो उभारण्यात व्यग्र होतो. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात क्वचितच हिंदी चित्रपट गीतं गाऊ शकलो. दुसरं असं की अनेक संगीतकार माझ्या गायकीबद्दल साशंक होते. तरीही नौशादपासून आनंद-मिलिंदपर्यंत आणि अमिताभ बच्चनपासून गोविंदा-संजय दत्तपर्यंत सगळ्यांसाठी मी प्लेबॅक सिंगिंग केलं आहे.

□ तुमचं बालपण कष्टात गेलं?

– माझे वडील संगीतकार, गायक आणि स्टेज आर्टिस्ट होते. पण त्यांच्या जवळच्या मित्रांनी त्यांना खूप फसवलं. त्यामुळे आमची परिस्थिती फारच बिकट झाली होती. माझ्यासाठी पाच रुपये ट्युशन फी देणंही वडिलांना अशक्य झालं होतं. लहानपणी हे सगळं जवळून पाहिल्यामुळे आयुष्याचे खरे धडेच मला गिरवायला मिळाले.

□ परदेशात भारतीय संगीत कशाप्रकारे लोकप्रिय करता येईल?

– मेलोडी सर्वांनाच आवडते. आपलं भारतीय संगीत तर अतिशय सुमधुर श्रवणीय आहे. पण आपल्या देशात बोलल्या जाणाऱ्या असंख्य भाषांमुळेच खरी अडचण निर्माण होते. परिणामी झुबिन मेहता आणि पं. रवी शंकर यांना इथल्यापेक्षा परदेशात लोकप्रियता मिळाली. कारण संगीताची भाषा विश्वव्यापी असते. ●